लोकमत पु. पान क्र. 1

# हातभट्टीची दारू तयार करणाऱ्या अड्ड्यावर छापा

## गुन्हे शाखा व नायगाव पोलिसांची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** हातभट्टीची दारू तयार करणाऱ्या अड्ड्यावर गुन्हे शाखेच्या युनिट-२ च्या व नायगाव पोलिसांनी संयुक्तिक कारवाई करत छापा टाकून लाखोंचा मुद्देमाल नष्ट केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी सपोनि शिवकुमार गायकवाड यांनी गुरुवारी दिली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने अवैधरीत्या देशी दारू विक्री अगर वाहतूक करणाऱ्या व्यक्ती तसेच गावठी दारू निर्मिती करणाऱ्या भट्ट्यांची माहिती काढून त्या नष्ट करण्याबाबत वरिष्ठांकडून आदेश प्राप्त झाले आहेत. मिळालेल्या आदेशानुसार अवैध धंद्याची माहिती काढत असताना नायगावच्या कामण गावातील देवकुंडी जंगल परिसरात सुनील वाघात ही व्यक्ती अवैधरीत्या दारूची भट्टी लावत असल्याची माहिती प्राप्त झाली. या माहितीच्या आधारे गुन्हे शाखा युनिट-२ आणि नायगाव पोलिस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार यांनी संयुक्त कारवाई करत कामण गावातील देवकुंडी जंगल परिसरात बुधवारी छापा मारला.

### सव्वादोन लाखांचा मुद्देमाल केला नष्ट

- या छापा कारवाईमध्ये पाच हजार लिटर नवसागर गुळमिश्रित वॉश, २४० लिटर गावठी हातभट्टीची दारु व गावठी हातभट्टीची दारु तयार करण्याची साधने असा एकूण २ लाख २७ हजार ७०० रुपये किमतीचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला. आरोपी सुनील वाघात याच्याविरुद्ध गुन्हे शाखेचे पोलिस अंमलदार अजित मैड यांनी नायगाव पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.
- ही कामगिरी पोलिस आयुक्त मधुकर पाण्डेय, अपर पोलिस आयुक्त दत्तात्रय शिंदे, पोलिस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलिस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-२ चे पोलिस निरीक्षक शाहूराज रणवरे, सपोनि सागर शिंदे, हवालदार रवींद्र पवार, सचिन पाटील, रमेश आलदर, अजित मैड, प्रतीक गोडगे, उपनिरीक्षक अनिल मोरे, हवालदार महेश बोडके, दिगंबर काळे, कामिनी पवार यांनी पार पाडली आहे.



कामण गावातील देवकुंडी जंगल परिसरात बुधवारी पोलिसांनी छापा मारून हातभट्टीची दारु तयार करण्याचे साहित्य नष्ट केले.

# नालासोपाऱ्यात लाखोंची चोरी

**नालासोपारा :** श्रीप्रस्था येथील निलगंगा अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या रागिनी सिंग (४०) यांच्या घरी ५ नोव्हेंबरला रात्री लाखोंची चोरी झाली आहे. त्यांनी बेडवर काढून ठेवलेले ३ लाख १८ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने त्यांना आढळले नाहीत. चोरट्याने त्यांच्या उघड्या घराच्या दरवाजातून सोन्याचे दागिने चोरून नेले आहे. नालासोपारा पोलिसांनी बुधवारी गुन्हा दाखल केला आहे.

# विष पिऊन आत्महत्या



**नालासोपारा :** गास गावातील कांदुक नंबर १ येथे राहणारे विलास गोन्सालविस (वय ४८) यांनी विष पिऊन आत्महत्या केली आहे. त्यांनी सोमवारी विष प्राशन केले. त्यानंतर उपचारासाठी वसईच्या डिसोझा हॉस्पिटलमध्ये त्यांना दाखल केले होते, तिथे त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. नालासोपारा पोलिसांनी बुधवारी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# आजारामुळे आत्महत्या

**नालासोपारा :** यशवंत गौरव येथील आनंद हाईट्स येथे राहणारे निपेश चंदर (वय ५५) यांनी उंदीर मारण्याचे औषध पिऊन आत्महत्या केली आहे. त्यांना किडनीचा आजार असल्याने त्याला कंटाळून त्यांनी बुधवारी उंदीर मारण्याचे औषध पिले. त्यांना उपचारासाठी ओझोन हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. तिथे त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. आचोळे पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.



# दुचाकीचा अपघात; तरुणाचा मृत्यू, तर एक जखमी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** नायगाव ब्रीजवर मंगळवारी रात्री झालेल्या दुचाकीच्या अपघातात एकाचा मृत्यू तर एक गंभीर जखमी झाला आहे.

उमेळा गावातील हनुमान आळी येथे राहणारा सुशांत सावंत आणि गणेश चाळीतील अजय दईत हे दोघे दुचाकीवरून मंगळवारी रात्री प्रवास करत होते. नायगाव पूर्व पश्चिमेला जोडणाऱ्या पुलावर सुशांत सावंतने त्याच्या ताब्यातील दुचाकी रहदारीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून चालवली. यात दुचाकीवरील ताबा सुटल्याने पुलाच्या उतारावर गाडी घसरून खाली पडली. यात दोघांना दुखापत झाली. अजय यांना उपचारासाठी वसईच्या सर डी.एम. पेटीट हॉस्पिटल येथे आणले. उपचारादरम्यान अजय दईत याचा बुधवारी पहाटे साडेचार वाजता मृत्यू झाला. सुशांतने नियमांचे उल्लंघन करून दुचाकी चालवून अजयच्या मृत्यूस कारणीभूत झाले. नायगाव पोलिसांनी बुधवारी गुन्हा दाखल केला.

CamScanner

Scanned with OKEN Scanner

लोकमत पु. पान क्र. २

बेकायदा ट्रॅक्टर्समुळे अपघाताची भीती

# वसईत नंबर प्लेट्स नसलेली वाहने रस्त्यावर

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वसईत बेकायदेशीर ट्रॅक्टर्सनी धुमाकूळ घातला असून, महसूल व वाहतूक विभागाने याकडे दुर्लक्ष केल्याने या व्यवहारात आर्थिक संबंध जोपासले जात असल्याचा आरोप केला जात आहे.

गौण खनिजे, पाषाणासह मातीसुद्धा शासनाच्या परवानगीशिवाय विक्री केली जाऊ नये, असा शासकीय नियम आहे. वसईत मात्र याला तिलांजली देऊन माती विक्रीचा व्यवसाय सुरू आहे. नवीन विकासकामे, इमारती तसेच तलावातील गाळ काढण्याच्या निमित्ताने हजारो ब्रास माती काढली जाते. ही माती लाखो रुपयांना विक्री केली जाते. महसूल नियमानुसार अशा प्रकारच्या विक्रीला निर्बंध आहेत. विक्री करायची झाल्यास त्याचे स्वामित्व धन (रॉयल्टी) भरूनच व्यवहार करण्याची तरतूद आहे.





वसईतील रस्त्यांवर वाहतूक परवाना नसलेले तसेच नंबर प्लेटही नसलेले बेकायदा ट्रॅक्टर्स धावत असून अपघाताची भीती व्यक्त होत आहे.

■ वसई नवघरपासून पश्चिम पट्ट्यात डंपरमध्ये बेकायदेशीर, क्षमतेबाहेर रेबिट व इतर बांधकाम साहित्य, रेती, माती वाहतूक केली जाते. त्याची रॉयल्टी नसते, वाहतूक परवानाही नसतो तसेच नंबर प्लेटही नसतात. क्षमतेबाहेर दगड, रेती, रॅबिट भरून वाहतूक सुरू असताना काही ठिकाणी दगड पडून अपघात झाले आहेत. यामुळे मोठा अपघात होऊन जीवितहानी झाल्यावर अधिकारी जागे होणार का? असा प्रश्न सामान्य नागरिक करीत आहेत.

## आक्षेप घेणाऱ्या वाहनधारकांना धमक्या, शिवीगाळ

शासनाचा कोट्यवधीचा महसूल बुडवून अनेक बिल्डर्स, ठेकेदार, माती विक्रीत गुंतले आहेत. व्यावसायिक स्वतःचे उखळ पांढरे करीत आहेत. अगदी बिनदिक्कत आणि बिनबोभाट सुरू असलेल्या या व्यवसायात जिल्ह्याबाहेरची मंडळी गुंतलेली आहेत.वास्तविक पाहता ट्रॅक्टर्स शेतीच्या उपयोगासाठी आहेत, मात्र वसईत ट्रॅक्टर्सचा उपयोग रेती, रेबिट व माती, वाळू, दगड, इतर बांधकाम साहित्य वाहतुकीसाठी केला जात आहे. येथील बहुतांश ट्रॅक्टर्सचा परवाना इतर जिल्ह्यातील आहे. तरीही बेकायदेशीरपणे माती उत्खनन करणाऱ्या लॉबीत ट्रॅक्टर्स अत्यावश्यक घटक म्हणून उपयोगी येऊ लागले आहेत. त्यास वसईतल्या शासकीय यंत्रणेने खुला परवाना दिल्याने रस्त्यावर सर्व वाहतुकीचे नियम मोडून भरधाव वेगात ट्रॅक्टर्स हाकताना दिसून येत आहेत. याबाबत इतर वाहनधारकांनी आक्षेप घेतला असता ट्रॅक्टर्सचालक धमक्या, शिवीगाळ करतात. अशीच अवस्था ट्रक व डंपरबाबत आहे.

# तडीपार आरोपीवर कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : तडीपारीचे आदेश असतानाही विरारमध्ये वास्तव्य करणाऱ्या आरोपीविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. पोलिस उपायुक्त परिमंडळ-३ च्या आदेशानुसार मुंबई शहर, मुंबई उपनगर, पालघर, ठाणे व रायगड या जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्रातून आरोपी सन्नी सरोदे (वय २४) याला दोन वर्षांसाठी ८ फेब्रुवारी २०२४ रोजी तडीपार केले होते. मात्र हा आरोपी सन्नी बुधवारी चंदनसार परिसरातील साई जीवदानी चाळ येथे गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या पोलिसांना आढळून आला. आरोपीविरोधात पोलिस अंमलदार युवराज वाघमोडे यांनी विरार पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

CS CamScanner

Scanned with OKEN Scanner

लोकमत पू. पान क्र. 4

# अन्याय, शोषणाला आम्ही कंटाळलो

## जोशी रुग्णालयातील कंत्राटी कर्मचारी सामूहिक सुट्टीवर जाणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** २०१५ साली मंजूर झालेल्या वेतनात १० वर्षे झाली तरी शासनाने वाढ केली नाही. महागाई कित्येक पटीने वाढली, पण शासनाने आमचे वेतन काही वाढविले नाही, असे गाऱ्हाणे राज्य शासनाच्या भाईंदर येथील पंडित भीमसेन जोशी शासकीय रुग्णालयातील १६२ कंत्राटी कर्मचाऱ्यांनी घातले आहे. हे सर्व कर्मचारी येत्या मंगळवारपासून सामूहिक रजेवर जाणार आहेत. शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करूनदेखील आमच्यावर अन्याय व आमचे शोषण होत असल्याने हा निर्णय घेतल्याचे कर्मचारी म्हणाले.

भीमसेन जोशी रुग्णालयात कुशल व कुशल असे कंत्राटी कर्मचारी मोठ्या संख्येने ठेकेदाराच्या माध्यमातून कार्यरत आहेत. त्यांचे वेतन तुटपुंजे असल्याने त्यांची परवड होते.



- कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन तुटपुंजे असल्याने उदरनिर्वाह करणे, कर्जाचे हप्ते फेडणे, कौटुंबिक जबाबदाऱ्या, पाल्यांचा शैक्षणिक खर्च करण्यासह इतर जबाबदाऱ्या पार पाडणे जिकीरीचे होत आहे.
- कंत्राटी कर्मचारी लिपिक व स्टाफ नर्स, एक्स-रे टेक्निशियन व ईसीजी तंत्रज्ञ, पोस्ट मार्टेम विभागातील कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन हे २०१५ च्या शासननिर्णयाने शहरी भागात व ग्रामीण भागात लिपिक मासिक वेतन हे दरमहा १५ हजार ९६ रुपये आहे. त्यातून सर्व कपात करून दरमहा ११ हजार ४०० रुपयेच हाती येतात.

### शासनसेवेत समावेश करून घेण्याची मागणी

- स्टाफ नर्स, एक्स-रे टेक्निशियन व ईसीजी तंत्रज्ञ यांना दरमहा २५ हजार वेतन असून कपात करून २० हजार ८०० रुपये इतके वेतन दरमहा मिळत आहे. तसेच एकूण तीन कंत्राटदार असून कर्मचाऱ्यांचा पगार, पी.एफ., ई.एस.आय.सी. वेळेवर टाकला जात नाही. तसेच पगार, पी.एफ. कमी टाकला जात आहे.
- या कर्मचाऱ्यांचा पगार हा २०१५ च्या शासननिर्णयानुसार असून १० वर्षांत इतकी महागाई वाढली तरी पगार मात्र वाढलेला नाही. तुटपुंज्या पगारामध्ये परिवाराचा उदरनिर्वाह करणे खूप जिकीरीचे झाले असल्याचे कर्मचारी म्हणाले. नॅशनल हेल्थ मिशनमध्ये किंवा शासनसेवेत समावेशन करून घेण्याची विनंती कर्मचारी यांनी केली आहे.

# दरोडाप्रकरणी दोघे अटकेत

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोड भागात अमेरिकी डॉलर स्वस्तात विकायचे सांगून एका जीम ट्रेनरला आठ जणांनी शस्त्राचा धाक दाखवून १३ लाख ५० हजारांना लुटण्याची घटना घडली आहे. पोलिसांनी दोघांना अटक केली आहे.

साईबाबानगरमधील साई विकास इमारतीत अनिकेत सिंग हे जीम ट्रेनर राहतात. आफान व साहिल ऊर्फ आतिफ यांनी त्यांच्याकडे ५६ हजार ४४३ यूएस डॉलर असून प्रत्येकी रुपये ८७ प्रमाणे विकायचे आहेत, असे अनिकेत यांना सांगितले. अनिकेत कारमध्ये जाऊन बसले व व्यवहाराकरिता आणलेले १३ लाख ५० हजार अफान यास दिले होते. तोच तीन दुचाकीवरून सहा अनोळखी इसम तोंडावर रुमाल बांधून कारच्या बाजूला आले व चाकू अनिकेतच्या बाजूने फिरवला. अफान याने १३ लाख ५० हजार कारच्या दरवाजाजवळ असलेले दुचाकीस्वाराकडे दिले. अनिकेत हे कारमधून उतरले असता अफान याने कार पळवून तेथून निघून गेला. अनिकेत यांच्या फिर्यादीवरून मीरा रोड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकमत पू. पान क्र. 2



वाहनांची काच फोडून चोरी करणाऱ्या तामिळनाडूच्या तिरची गँगमधील आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.

# तामिळनाडूच्या तिरची गँगच्या आरोपीला अटक

## वाहनांची काच फोडून करायचा चोरी

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : तामिळनाडूतील तिरची गँगच्या आरोपीला अटक करण्यात नालासोपारा गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांना यश आले आहे. आरोपी सराईत गुन्हेगार असून, तो वाहनांची काच फोडून चोरी करायचा. पोलिसांनी सहा गुन्ह्यांची उकल केल्याची माहिती नालासोपाऱ्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विशाल वळवी यांनी गुरुवारी दिली आहे.

अंबाडीच्या लाभ कॉम्प्लेक्समध्ये राहणारे अमित गडकरी (५५) हे १९ ऑक्टोबरला दुपारी कारने वैयक्तिक कामासाठी नालासोपारा पश्चिमेत कोटक बँकेत आले होते. ते गाडीच्या मागील सीटवर २ लॅपटॉप व २७ हजाराची रोख सॅकमध्ये ठेवून वाहन लॉक करून बँकेत आले. काम संपून वाहनाजवळ आल्यावर मागील काच फुटलेली दिसली तसेच सॅक सीटवर नव्हती. गाडीतून सॅक चोरी झाल्याने त्यांनी नालासोपारा पोलिस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल केला होता.

### सहा गुन्ह्यांची उकल

- पोलिसांनी आरोपीचा शोध घेताना नालासोपारा, वसई, बोरिवली व मुंबई परिसरातील सुमारे २५० सीसीटीव्ही कॅमेरे तपासले. घटनास्थळावरील पुरावे व तांत्रिक माहितीच्या आधारे गुन्ह्याचा तपास करत आरोपी शन्मुगम अमरनाथन (वय ३८) याला त्याच्या राहत्या घरातून दि. ९ सप्टेंबरला अटक करण्यात आली. आरोपीने गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्याच्याकडून २० हजारांचा एचपी कंपनीचा १ लॅपटॉप आणि २७ हजार रुपये रोख रक्कम असा एकूण ४७ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.
- आरोपीकडे चौकशी केली असता त्याने त्याच्या साथीदारांसोबत मिळून मुंबई, नवी मुंबई परिसरात ठिकठिकाणी चोरी केलेल्या आहेत.
- आरोपीकडून नालासोपारा पोलिसांनी सहा गुन्ह्यांची उकल केली आहे. आरोपीवर परराज्यात १३ गुन्हे यापूर्वी दाखल आहेत.

दैनिक भास्कर पान क्र. 3

# गाड़ियों का कांच तोड़कर देता था चोरी की वारदात को अंजाम

- शिवसेना (उद्धव) के नेता को भी बनाया था शिकार
- शातिर अपराधी तमिलनाडु से किया गया गिरफ्तार



भास्कर संवाददाता | वसई

शिवसेना(उद्धव) नेता विधायक भास्कर जाधव की कार तोड़कर बैग लिफ्टिंग करने वाले गिरोह के एक आरोपी को नालासोपारा पुलिस ने तमिलनाडु से गिरफ्तार किया है। आरोपी वसई-विरार शहर सहित मुंबई, रायगड और कर्नाटक में दर्जन भर से ज्यादा वारदात को अंजाम दे चुका है। पुलिस ने आरोपी से पूछताछ के बाद 6 मामलों का खुलासा किया है। आरोपी की पहचान शनमुगन अमरनाथ के रूप में हुई है।

पुलिस के मुताबिक, वसई निवासी शिकायतकर्ता अमित गडकरी अपने कार से नालासोपारा (पश्चिम) स्थित कोटक बैंक में गए थे। इससे पहले वे सड़क किनारे गाड़ी पार्क कर एक बैग में दो लैपटॉप और 27 हजार रुपए नकद रखकर गाड़ी लॉक की थी। जब वे वापस गाड़ी के पास आए तो बैग गायब था। अज्ञात लोगों ने गाड़ी का कांच तोड़कर चोरी की वारदात को अंजाम दिया था। इसकी शिकायत उन्होंने नालासोपारा पुलिस स्टेशन में दर्ज कराया था। इस मामले को लेकर नालासोपारा की डिटेक्शन टीम जांच में जुट गई और मुखबिरों को सक्रिय कर दिया था।

**250 सीसीटीवी फुटेज की जांच:** एपीआई राजेंद्र चंदनकर ने बताया कि घटना के बाद पुलिस टीम ने शहर में लगाए गए करीब 250 सीसीटीवी फुटेज की जांच की। फुटेज के आधार पर टीम मुंबई पहुंची। जांच पाया गया कि ऐसी घटना को तमिलनाडु की तिरची गैंग अंजाम देती है। सूचना के आधार पुलिस टीम ने सीसीटीवी फुटेज तमिलनाडु पुलिस को भेजकर वहां के मुखबिरों को सक्रिय किया। जांच के दौरान पुलिस को सूचना मिली आरोपी तमिलनाडु में छुपकर रहता है। इसके बाद नालासोपारा पुलिस ने उसे गिरफ्तार कर लिया।

**शिवसेना भवन के पास गाड़ी को बनाया था निशाना:** आरोपी ने पुलिस को बताया कि दादर के शिवसेना भवन के पास भी ऐसी ही वारदात को अंजाम दिया था। पुलिस की जांच में पता चला कि शिवसेना भवन से पास खड़ी गाड़ी विधायक भास्कर जाधव की थी। आरोपी ने इस गाड़ी से लैपटॉप, पेनड्राइव, हेडफोन सहित फाइल चोरी की वारदात को अंजाम दिया था। फिलहाल पुलिस मामले की जांच में जुटी है।

CamScanner

Scanned with OKEN Scanner

पुढारी पु. पान क्र. १

## गांजा विकणारा अटकेत

**विरार :** नालासोपारा तुळींजच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी मंगळवारी दुपारी गांजा पकडला आहे. पोलिसांनी दीड वाजण्याच्या सुमारास टोळी स्मशानभूमी जवळ नवाज खान (१९) या संशयित आरोपीला पकडले. त्याची झडती घेतल्यावर त्याच्याकडे ३६ हजार ४२० रुपयांचा २ किलो ४२८ ग्राम गांजा बेकायदेशीर विक्रीसाठी बाळगलेला आढळून आला आहे. अश्फाक जामदार (३४) यांनी तक्रार देऊन गुन्हा दाखल केल्यावर गांजा जप्त करून आरोपीला अटक केली आहे. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## महिलेची आत्महत्या

**विरार :** वसईच्या वाघराल पाडा येथील जय हिंद चाळीतील एका महिलेने आत्महत्या केली. महिलेने शनिवारी रात्री घरात लोखंडी पाइपला ओढणीच्या साह्याने गळफास लावून आत्महत्या केली. वालीव पोलिसांनी यासंदर्भात आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

## महिलांविरोधात गुन्हा

**विरार :** सार्वजनिक ठिकाणी अश्लील हावभाव केल्याप्रकरणी वसई पोलीस ठाण्यात तीन महिलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसई पश्चिमेकडील रिक्षा स्टॅन्डजवळ ३० ते ५० वयोगटातील तीन महिला अश्लील हावभाव करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार तिन्ही महिलांना ताब्यात घेऊन कारवाई केली.

पुढारी पान क्र. ३

## दारूभट्टीवर पोलिसांचा छापा

**मिरा रोड :** नालासोपारा, धानीवबाग येथील डोंगरात गावठी हातभट्टीची दारु तयार करणाऱ्या अड्ड्यावर मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने छापा टाकुन लाखोचा मुद्देमाल नष्ट केला आहे. १३ नोव्हेंबर रोजी प्रभाकर भोये, रा. सागपाडा, धानीवबाग, नालासोपारा पूर्व हा पेल्हार पोलीस ठाणे हद्दीतील मौजे हरवटेपाड , धानीवबाग, येथुन २ किलोमीटर आतमध्ये डोंगरात गैरकायदेशीर गावठी हातभट्टीची दारु तयार करत असल्याची पोहवा शिवाजी पाटील यांच्या बातमीदाराकडून मध्यवर्ती गुन्हे प्रकटिकरण कक्षाचे पथकाला मिळाली. मिळालेल्या माहितीवरुन त्या ठिकाणी सपोनि दत्तात्रय सरक, पोहवा, संतोष मदने, शिवाजी पाटील, हनुमंत सुर्यवंशी, गोविंद केंद्रे, सतीष जगताप, राजाराम काळे, पोअं. अकील सुतार, साकेत माघाडे, नितीन राठोड या पथकाने छापा टाकला. या छाप्यात २८०० लिटर नवसागर गुळ मिश्रीत वॉश , १४० लिटर गैरकायदा गावठी हातभट्टीची दारु तसेच गावठी हातभट्टीची दारु तयार करण्याची साधने असा १,४२,००० -रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला आला. आरोपी प्रभाकर भोयेवर गुन्हा दाखल केला.

CS CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुढारी पान क्र. 5

# टोलमाफी झाली; वाहतूककोंडीतून सुटका नाहीच

## दहिसर टोल नाक्यावरील वाहतूककोंडी ठरतेय डोकेदुखी

**भाईंदर : राजू काळे**

मिरा-भाईंदर व मुंबई उपनगरातील दहिसरच्या वेशीवर असलेल्या चेकनाका परिसरातील टोल धाडीतून तत्कालीन राज्य सरकारने हलक्या वाहनांची सुटका केली. हि टोल धाड मुक्ती येथील वाहतूक कोंडीवरील उपाय म्हणून शोधण्यात आल्याचे त्यावेळी स्पष्ट करण्यात आले. मात्र सरकारने केलेल्या टोल धाड मुक्तीने येथील वाहतूक कोंडीवर कोणताही परिणाम न होता ती नित्यनियमाने होत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे येथील वाहतूक कोंडीतून लोकांची सुटका कधी होणार, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

मिरा-भाईंदरच्या दक्षिण वेशीवर असलेल्या दहिसर टोल नाका हा वाहतूक कोंडीच्या नावाने डोकेदुखी ठरत असून त्यावर कोणत्याही सरकारने अद्यापही ठोस उपाययोजना केलेली नाही. तत्कालीन महायुती सरकारने मुंबईच्या प्रवेशद्वारावर असलेल्या सर्व टोल नाक्यावरील टोल धाडीतून हलक्या वाहनांची सुटका केल्याचे जाहीर केले. यामागे त्या-त्या टोलनाक्यांवर होणाऱ्या वाहतूक कोंडीची समस्या निकाली निघेल, असा कयास लावला गेला. मात्र तत्कालीन सरकारचा हा कयास फुसका बार ठरल्याने येथील वाहतूक कोंडी नित्यनियमाचीच झाल्याचा प्रत्यय येथून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना येऊ लागला आहे. त्याचा फटका तातडीच्या सेवा देणाऱ्या वाहनांना देखील पूर्वीसारखाच बसू लागल्याने टोल माफीचा उतारा वाहतूक कोंडीसाठी प्रभावी ठरला नसल्याचेच स्पष्ट झाले आहे. यामुळे टोल वसुलीवेळी होत असलेली व टोल माफी नंतर होणारी वाहतूक कोंडी जैसे थे असल्याचे निदर्शनास येत आहे. परिणामी येथील वाहतूक कोंडी रुग्ण, चाकरमानी आदींच्या प्रवासासाठी जीवावर बेतणारी व विलंबकारी ठरल्याचे स्पष्ट झाले आहे.

येथील वाहतूक कोंडीची ज्वलंत समस्या निकाली काढण्यासाठी हा टोल नाका हटविण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून केली जात आहे. काही वेळा युती सरकारमधील मित्र पक्षांनी आंदोलने छेडून सरकारला घरचा आहेरही दिला. तरीही हा टोल नाका हटविण्याची धमक राज्य सरकारमध्ये दिसून आली नाही. मात्र त्यावर उपाय म्हणून तत्कालीन महायुती सरकारने हलक्या वाहनांसाठी टोल माफीचा उतारा शोधला. तरी देखील येथील वाहतूक कोंडी लोकांची पाठ काही केल्या सोडत नसल्याचे दिसून येत आहे. दरम्यान हा टोल नाका इतर ठिकाणी स्थलांतर करण्याची सूचना राज्य सरकारला करण्यात आली. त्यालाही केराची टोपली दाखविण्यात आल्याने टोल वसुली करणारी ठेकेदार कंपनी सरकारसाठी वजनदारच असल्याचे स्पष्ट झाले आहे. येथील वाहतूक कोंडीला पर्याय म्हणून भाईंदर ते दहिसर लिंक रोडची संकल्पना तत्कालीन महायुती सरकारच्या काळातच पुढे आली. त्यासाठी मुंबई महापालिकेने पुढाकार घेत या लिंक रोडच्या बांधकामाचा संपूर्ण खर्च करण्याचा निर्णय घेतला.



### नियोजित लिंक रोड टोलमुक्तच पाहिजे

पालिकेने या लिंक रोडच्या बांधकामाचा ठेका मेसर्स एल अँड टी या कंपनीला दिला. त्याच्या कामाला सुरुवात झाल्याचा दावा करण्यात येत असून या लिंक रोडवर देखील टोल वसुली होणार असल्याचे बोलले जात आहे. मात्र त्यातून हलक्या वाहनांची सुटका होईल कि नाही, हे अद्याप गुलदस्त्यात असले तरी या लिंक रोडच्या बांधकामाचा खर्च मुंबई महापालिकेकडून करण्यात आल्याने नियोजित लिंक रोड टोल धाड मुक्तच असला पाहिजे, अशी अपेक्षा लोकांकडून व्यक्त केली जात आहे. मात्र दहिसर टोल नाक्याअगोदर एमटीएनएलकडे जाणाऱ्या पर्यायी रस्त्यावर देखील टोल वसुली सुरु केल्याने येथून ये-जा करणाऱ्या वाहनांमुळे टोल नाक्यावरील वाहतूक कोंडीत आणखी भर पडत आहे. सरकारने वाहतूक कोंडीच्या समस्येवर टोल धाडमुक्तीचा उतारा शोधला असला तरी वाहतूक कोंडी मुक्तीसाठी ठोस उतारा मात्र शोधला नसल्याचे येथे होणाऱ्या वाहतूक कोंडीवरून स्पष्ट झाले आहे.

CS CamScanner

Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी पृ. पान क्र. 7

# पोलिसांमध्ये मतदान जनजागृती



**। मीरा रोड** : १४५ मीरा भाईंदर विधानसभा मतदारसंघ, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाकडून मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी भाईंदर व मीरा रोड येथील पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचाऱ्यांना, तसेच मीरा रोड व भाईंदर येथील गॅस एजन्सीमार्फत नागरिकांमध्ये मतदान जनजागृती करण्यात आली.

महापालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) तसेच नया नगर, मीरा रोड येथील पोलीस ठाण्याला भेट देऊन मतदान जनजागृती करण्यात आली. भाईंदर पश्चिम येथील भारत गॅस एजन्सी, व्ही. सी. शाह एच.पी. गॅस एजन्सी, सेकंडरी स्कूलच्या बाजूला व देवमोगरा भारत गॅस सर्व्हिस, मीरा रोड येथे मतदान जनजागृती संदेश स्टिकर गॅस बाटलावर लाऊन २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान करण्याचा संदेश देण्यात आला. मतदानाची टक्केवारी वाढावी, या उद्देशाने स्वीप पथकाव्दारे हा अनोखा उपक्रम राबवण्यात आला. या कार्यक्रमासाठी स्वीप पथक उपस्थित होते.

# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीला अटक

**। मीरा रोड** : गोराई पोलीस ठाणे हद्दीत अनोळखी व्यक्तीचा अज्ञात आरोपीने खून करून, मृतदेहाचे तुकडे करून मृतदेहाची विल्हेवाट लावल्याबाबत गोराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. या खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीला भाईंदर पोलिसांनी शोधून अटक केली आहे. खुनाचा गुन्हा उघडकीस आणून आरोपीला गोराई पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. भाईंदर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिकराव कतुरे, पोलीस उपनिरीक्षक प्रसाद गोवले व स्टाफ असे कर्तव्यावर असतांना त्यांना गोराई पोलीस ठाण्यातून आरोपीची माहिती मिळाली. नंतर कतुरे यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली संशयित आरोपीची माहिती मिळवली. त्याआधारे संशयित आरोपी मोहम्मद सत्तार हनिफ (२४) याला ताब्यात घेऊन चौकशी केल्यानंतर त्याने गुन्हा कबूल केला. गोराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असल्याने मोहम्मद सत्तार हनिफ याला गोराई पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

# आगीत नालासोपाऱ्यातील टपऱ्या जळून खाक; जीवितहानी टळली



**। वसई** : मध्यरात्री दोन वाजता लागलेल्या आगीत फुटपाथवरील अनेक टपऱ्या जळून खाक झाल्याची घटना नालासोपाऱ्यात घडली आहे.

तुळींज पोलीस ठाण्यालगत असलेल्या सेंट्रल पार्क रस्त्यावर शेकडो टपऱ्या आहेत. त्यापैकी काही टपऱ्यांना बुधवारी मध्यरात्री दोन च्या सुमारास आग लागली. या आगीची खबर अग्निशमन दलाला देईपर्यंत १० ते १५ टपऱ्यांना आगीने वेढले. पाहता-पाहता त्यात काही टपऱ्या जळून खाक झाल्या. अग्निशमन दलाने घटनास्थळी जाऊन आगीवर नियंत्रण मिळवले. टपऱ्यातील दुकानदारी रात्री ११ पर्यंत बंद होते. खाद्यपदार्थांपासून ते कपड्यांच्या विक्रीपर्यंतचे अनेक व्यवसाय या टपऱ्यांमधून केले जातात. त्यापैकी कोणत्या टपरीला सुरुवातीला आग लागली आणि आगीचे नेमके कारण काय, हे मात्र समजू शकले नाही. सुदैवाने त्यात कोणतीही हानी झाली नसली तरी लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

CS CamScanner

Scanned with OKEN Scanner


पुण्यनगरी पान क्र. 2

# खड्डे, धुळीत हरवला चिंचोटी-भिवंडी राज्यमार्ग

## अपघात, आजारांत वाढ, वेळेसह इंधनाचा अपव्यय

। वसई : खड्डे आणि धुळीत चिंचोटी-कामण-भिवंडी राज्य महामार्ग बरबटल्यामुळे नागरिकांच्या जीवाला आणि आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. या रस्त्यातून वाट काढताना वेळ आणि वाहनांचे इंधनही वाया जात आहे.

वसई पूर्वेकडील चिंचोटी-भिवंडी रस्त्याचे काँक्रीटीकरणाचे काम सुरू असले तरी रस्त्याच्या अर्धवट अवस्थेमुळे नागरिकांच्या अडचणी वाढल्या आहेत. मोठ मोठे खड्डे, उखडलेले डांबरीकरण आणि धुळीच्या लोटामुळे हा रस्ता धोकादायक बनला आहे. दैनंदिन प्रवास करणारे शाळकरी विद्यार्थी, कामगार, वयोवृद्ध आणि रुग्णवाहिका यांना या रस्त्यामुळे गंभीर त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्याच्या बाजूला पसरलेली धूळ वातावरण प्रदूषित करत आहे. यामुळे नागरिकांना श्वसनाचे आजार होत आहेत. खड्डे वाचवत मार्गक्रमण करताना वाहनांचे नुकसान तर होतेच, अपघातांची



संख्याही वाढत चालली आहे.

या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी नागरिक आणि राजकीय पक्षांनी अनेकदा आंदोलने केली. अर्ज-विनंत्या केल्या. परिणामी, सार्वजनिक बांधकाम विभागाने काही दिवसांपूर्वी काँक्रीटीकरणाचे काम सुरू केले. मात्र, मोठे खड्डे असलेल्या ठिकाणचे काम ठेकेदाराने हाती न घेतल्यामुळे धूळ, वाहतूक कोंडी आणि अपघातांमध्ये वाढ झाल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

रस्त्यावर पसरलेल्या धुळीमुळे श्वसनाच्या समस्या, विशेषतः लहान मुले आणि वयोवृद्धांमध्ये वाढल्या आहेत. रुग्णवाहिकांनादेखील या रस्त्यावरून वेळेत पोहोचणे कठीण झाले आहे. यामुळे रुग्णांची अवस्था बिकट होत आहे. चिंचोटी-भिवंडी या राज्य महामार्गावरून भिवंडी, वसई, गुजरात, पालघर, मुंबई अशा ठिकाणी वाहनांची वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असते.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक कोंडी झाल्यास चिंचोटी-भिवंडी या मार्गाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. मात्र, या मार्गावरील समस्या वाढल्यामुळे वाहने अडकून पडत आहेत. त्यामुळे हा रस्ता युद्धपातळीवर हाती न घेतल्यास वाहनचालक आणि ग्रामस्थांच्या समस्येत वाढ होणार असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पृ. पान क्र. 1

# वसईत मंजूर आमदार निधीपेक्षा जास्त खर्च

## जिल्हा नियोजन समितीचे पत्र

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई विधानसभा क्षेत्रासाठी मंजूर खर्चापेक्षा जास्त आमदार निधी वापरल्याची माहिती जिल्हा नियोजन समितीने दिलेल्या पत्रातून समोर आली आहे. पाच वर्षांत वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर यांनी १८ कोटी ८८ लाख ९७ हजार रुपयांची एकूण १०३ कामे केली आहेत. प्रशासकीय मान्यता केवळ साडेसतरा कोटींच्या कामांना मिळाली आहे.

वसई विधानसभा निवडणुकीसाठी आमदार निधीचा मुद्दा चर्चेत आला आहे. वसईचा आमदार निधी न वापरता परत गेल्याचा आरोप विरोधकांनी प्रचारात केला आहे. मात्र ठाकूर यांनी सर्व आमदार निधी वापरून मंजूर खर्चापेक्षा जास्त रकमेची कामे केल्याचे जिल्हा नियोजन समितीच्या पत्रावरून स्पष्ट झाले आहे. ठाकूर यांनी पाच वर्षांच्या कालावधीसाठी १०३ कामे सादर केली होती. त्यासाठी १७ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मिळालेला होता. मात्र ठाकूर यांनी त्यापेक्षा अधिक निधी वापरात आणला आहे. त्यात पुढील वर्षीच्या दायित्व रकमेचा समावेश आहे. २०२४-२५ आर्थिक वर्षात तीन कोटी २० लाख इतका निधी मंजूर होता. ठाकूर यांनी अडीच कोटींची कामे प्रस्तावित केली होती. मात्र यापूर्वीच जास्त निधीचा वापर केल्याने केवळ दोन कोटी ४० लाख रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता प्रदान करता येईल, असे नियोजन अधिकारी प्रशांत भामरे यांनी पत्रात म्हटले आहे.

## ‘कामे कमी करण्याची सूचना’

**आमदार निधीचा पुरेपूर वापर तर केला आहे शिवाय अधिक रकमेची कामे आम्ही केली आहेत. त्यामुळे कामांचे प्रस्ताव सादर केले असता कामांची यादी कमी करा असे मला जिल्हा नियोजन समितीकडून सांगण्यात आल्याची माहिती हितेंद्र ठाकूर यांनी दिली. याशिवाय आमदार निरंजन डावखरे, आमदार भाई जगताप आणि आमदार जयंत पाटील यांचाही आमदार निधी वसई मतदारसंघात वापरून कामे केल्याची माहिती ठाकूर यांनी दिली.**

## मनाई आदेश

**वसई :** पुढील आठवड्यात विधानसभा निवडणुका होत असून त्यादृष्टीने पोलिसांनी खबरदारी म्हणून समाजमाध्यमांचा वापर जपून करण्याचे आवाहन केले आहे. आक्षेपार्ह पोस्ट, भावना भडकवणारा मजकूर प्रसारित केल्यास कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. पालघर जिल्ह्यात १८ नोव्हेंबर ते १ डिसेंबर या कालावधीत मनाई आदेश लागू करण्यात आला आहे. सायबर शाखा विविध संकेतस्थळावर लक्ष ठेवून आहे. पाच किंवा त्यापेक्षा जास्त लोकांना एकत्र जमण्यास मनाई केली आहे.

CS CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पु. पान क्र. १

# वसईच्या निवडणूक प्रचारात धारावी प्रकल्पग्रस्तांचा मुद्दा

## वसईतील सामाजिक संघटना आक्रमक

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** मुंबईतील धारावी येथील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन वसईच्या मिठागराच्या जागेवर करण्याचा मुद्दा आता विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात अग्रस्थानी आला आहे. बहुजन विकास आघाडीने हा मुद्दा प्रचारात लावून धरला असून कुठल्याही परिस्थितीत प्रकल्पाला वसईत पाऊल ठेवू देणार नाही, असा इशारा दिला आहे. विविध सामाजिक संघटनांनी देखील या धारावीच्या प्रकल्पग्रस्तांचे वसईत पुनर्वसन करण्यास जोरदार विरोध केला आहे.

वसई शहराच्या पश्चिमेस रेल्वे स्थानकाला लागून नालासोपारा, आचोळे, नवघर-माणिकपूर, दिवाणमान, सनसिटी-गास परिसरात पंधराशे एकर मोकळी जागा आहे. गोगटे सॉल्ट कंपनीला ही जागा ९९ वर्षांच्या करारावर देण्यात आली होती. २०१४ मध्ये हा करार संपला. त्यानंतर ही मिठागराची जागा एमएमआरडीएकडे वर्ग करण्यात आली आहे. शहरातल्या अत्यंत मोक्याच्या ठिकाणी ही मोकळी जागा आहे. मुंबईतील धारावीच्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन या जागेत केले जाणार असल्याचा खळबळजनक आरोप आमदार क्षितीज ठाकूर यांनी केला आहे. केंद्रीय स्तरावरून मिठागराच्या जागेचे आरक्षण उठवून जागा बिल्डरांच्या घशात घालण्याचे षडयंत्र रचले जात असल्याचा आरोप केला आहे. धारावीतील प्रकल्पग्रस्त आले तर वसईचे नियोजन कोसळेल. वसईत प्रतिधारावी होऊ देणार नाही, असे क्षितीज ठाकूर प्रत्येक प्रचारसभेत सांगत आहेत. त्यामुळे आता धारावीचा मुद्दा वसईतील प्रचारसभेत जोर धरू लागला आहे.

### विरोध का?

- पर्यावरणासाठी काम करणाऱ्या निर्धार जनमंच या संस्थेने या प्रकल्पाला विरोध करताना यामुळे होणारे धोके सांगितले आहे. आधीच वसईत अनधिकृत बांधकामामुळे लोकसंख्या वाढली आहे. पुढील २० वर्षात वसईची लोकसंख्या ५० लाखांच्या घरात जाणार आहे. त्याचे नियोजन करताना दमछाक होणार आहे.
- जर धारावीतील आणखी लाको लोकसंख्येची भर पडली तर वसईचे नियोजन कोलमडेल आणि नागरिकांचे जगणे मुश्किल होईल, असे निर्भय जनमंच संस्थेचे अध्यक्ष मनवेल तुस्कानो यांनी सांगितले आहे. जर असा प्रकल्प आणण्यात येणार असेल तर आम्ही रस्त्यावर उतरून त्याचा विरोध करू असे त्यांनी सांगितले.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पृ.पान क्र. 1

# उड्डाणपुलावरील अपुऱ्या उंचीच्या कठड्यामुळे धोका

## नायगावमधील तरुणाच्या मृत्यूनंतर सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**वसई :** नायगाव पूर्व पश्चिमेला जोडणाऱ्या उड्डाणपुलावरील सुरक्षा कठडे हे कमी उंचीचे आहेत. अपुऱ्या असलेल्या कठड्यामुळे नुकताच २० वर्षीय तरुण अपघातानंतर थेट खाली कोसळून त्याचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर पुन्हा एकदा कठड्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

नायगाव पूर्व -पश्चिमेला जोडणारा उड्डाणपूल मुंबई महानगर विकास प्राधिकरणा (एमएमआरडीए) ने तयार करून वाहतुकीसाठी हा पूल खुला आहे. या उड्डाणपूलामुळे वसई-विरार ते मुंबई, ठाणे, मिरा-भाईंदर या ठिकाणी प्रवास करण्याचे अंतर कमी झाले आहे. तसेच राष्ट्रीय महामार्गही जवळ असल्याने या पुलावरून होणारी वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. १.३ किलोमीटर लांबीच्या नायगाव उड्डाणपुलाला एमएमआरडीएने रेल्वेच्या भागात उंच सुरक्षा कठडे तयार केले आहेत. मात्र उर्वरित पुलाच्या दोन्ही बाजूने असलेले कठडे हे अपुऱ्या उंचीचे आहेत.

या मार्गावरून अनेक वाहनचालक हे भरधाव वेगाने वाहने चालवितात. तर काही जण कठड्याजवळ नागरिक थांबतात. याशिवाय उड्डाणपुलावर दोन घातक वळणेही आहेत, ज्यांचा अंदाज वाहनचालकांना लगेच येत नाही. परिणामी, अपघात झाल्यास कमी उंचीच्या सुरक्षा कठड्यांमुळे पुलावरून कोसळून गंभीर दुखापत किंवा जीवितहानी होण्याची भीती नागरिकांमधून करण्यात येत होती. शुक्रवारी सायंकाळी अशीच एक घटना नायगाव (पान ३ वर)

### लोखंडी सुरक्षा कठडे (सेफ्टी रेलिंग) बसविण्याकडे पाठ

नायगाव उड्डाणपुलावर कमी उंचीच्या सुरक्षा कठड्यांमुळे पुलावरून कोसळून दुर्घटना होऊ शकते. यासाठी कठड्याला सुरक्षेच्या दृष्टीकोनातून लोखंडी सुरक्षा कठडे (सेफ्टी रेलिंग) बसविण्यात यावे अशी मागणी नागरिकांनी केली होती. तर दुसरीकडे माजी सभापती कन्हैया भोईर यांनीसुद्धा याबाबत पत्र दिले होते. मात्र त्याकडे एमएमआरडीएने पाठ फिरवल्याने अशा घडत आहेत असा आरोप नागरिकांनी केला आहे.

# उड्डाणपुलावरील अपुऱ्या उंचीच्या कठड्यामुळे धोका

(पान १ वरून) उड्डाणपुलावर घडली. नायगाव पश्चिमेच्या वडवली परिसरात राहणारा अतुल दुबळा (२०) याचा दुचाकीवरून जात असताना अपघात घडला व त्याची दुचाकी थेट कठड्याला धडकली यात तो थेट पुलावरून खाली कोसळून त्याचा मृत्यू झाला आहे.

अशा प्रकारच्या दुर्दैवी घटनेमुळे पुन्हा एकदा या पुलावरील सुरक्षा कठड्यांचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे आता तरी एमएमआरडीएने सदर पुलाकडे लक्ष देऊन सुरक्षा कठड्यांच्या दृष्टीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी नागरिकांनी केली आहे. सदर उड्डाणपुलाच्या ठिकाणी पाहणी करून योग्य त्या उपाययोजना केल्या जातील असे एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

### ब्लिंकरची गरज

नायगाव उड्डाण पुलावर वाहनांची वर्दळ अधिक प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे पुलाच्या दोन्ही ठिकाणच्या उतार मार्गावर ब्लिंकर बसविण्याची गरज निर्माण झाली आहे. अनेक वाहने उतार मार्गाच्या ठिकाणावरून वळण घेतात यामुळे भरधाव वेगाने येणाऱ्या वाहनांची धडक लागण्याची शक्यता आहे. जर ब्लिंकर लावले तर वेग नियंत्रण करता येऊ शकेल असे नागरिकांनी सांगितले आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पु. पान क्र. 4

# वसई मतदारसंघात तिरंगी लढतीची रंगत

## बहुजन विकास आघाडीचा बालेकिल्ला भेदण्यासाठी महायुती, महाविकास आघाडी सज्ज

**कल्पेश भोईर, लोकसत्ता**

**वसई :** १९९० पासून विधानसभेत तब्बल सहा वेळा आमदार असणाऱ्या हितेंद्र ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडीचा पराभव करण्यासाठी महायुती आणि महाविकास आघाडी सज्ज झाले आहेत. या मतदारसंघात एकूण सात उमेदवार असले तरी बविआ, महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यामध्ये तिरंगी लढत होत आहेत. ठाकूर यांचा अभेद्य बालेकिल्ला भेदण्याचे आव्हान या विरोधकांपुढे आहे.

वसईत एकूण ३ लाख ५४ हजार मतदार आहेत. २०१९ मध्ये तत्कालीन शिवसेना-भाजप युतीच्या वतीने विजय पाटील यांनी निवडणूक लढवून ठाकूर यांना चांगली टक्कर दिली होती. त्या निवडणुकीत पाटील यांचा पराभव झाला असला तरी त्यांना ७७ हजार मते मिळाली होती. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर बहुजन विकास आघाडीचे हितेंद्र ठाकूर यांनी यापुढे निवडणूक न लढण्याचा निर्णय घेतला होता. मात्र राजकीय परिस्थिती बदलल्याने त्यांनी पुन्हा निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. या काळात महाविकास आघाडीची स्थापना झाली. विजय पाटील पुन्हा काँग्रेस पक्षात गेले आणि त्यांनी महाविकास आघाडीतर्फे तिकिट मिळवले आहे. महायुतीमधून ऐनवेळी स्नेहा दुबे-पंडित यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्या माजी आमदार विवेक पंडित यांच्या कन्या आहेत.

वसईत बविआचे हितेंद्र ठाकूर, महायुतीच्या स्नेहा दुबे, महाविकास आघाडीचे विजय पाटील यांच्यात मुख्य लढत होत असली तरी बसपाचे विनोद तांबे आणि तीन अपक्ष उमेदवार ही रिंगणात आहेत. मात्र मतांच्यादृष्टीने त्यांचे अस्तित्व नगण्य असल्याचे बोलले जाते.


वसई हा बहुजन विकास आघाडीचा बालेकिल्ला असला तरी नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांची पिछाडी झाली होती. महायुतीला ७६ हजार ३०७, महाविकास आघाडीला ६६ हजार ८५८ मते मिळाली होती. बविआची पिछेहाट होऊन त्यांना केवळ ५० हजार ८६८ मते मिळाली होती. यामुळे मविआ आणि महायुतीचे मनोबल उंचावले असून ही आघाडी कायम ठेवून विजय मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. तर बहुजन विकास आघाडी पक्ष सावध झाला आहे. त्यांनी पिछाडी भरून काढण्यासाठी काम सुरू केले आहे.



स्नेहा दुबे



विजय पाटील



हितेंद्र ठाकूर

### विरोधकांची बलस्थाने

स्नेहा दुबे यांना भाजप आणि श्रमजीवी संघटनेचे पाठबळ आहे. तर महाविकास आघाडीचे विजय पाटील यांना ख्रिस्ती मतदारांचे पाठबळ आहे. तसेच २९ गाव वगळण्याच्या आंदोलनातील ते प्रमुख नेते आहेत. त्यामुळे गावांच्या प्रश्नावर दिलेल्या लढ्यामुळे गावातून त्यांना सहानभुती मिळण्याची शक्यता आहे.

### समस्या आणि विकासाचे दावे

वसई मतदारसंघात आगरी, कोळी, ख्रिस्ती, आदिवासी, भंडारी, वाडवळ समाजातील मतदारांचे प्राबल्य आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीच्या उमदेवारांनी न सुटलेल्या नागरी समस्यांवरून बविआला घेरले आहे. २९ गावांचा महापालिकेत झालेला समावेश, मच्छीमारांचे प्रश्न, वाहतूक कोंडी, शहरात होणारी पूरपरिस्थिती, ६९ गावांची पाणीसमस्या, पश्चिम पट्ट्यातील पाण्याची समस्या, रुग्णालयांचा अभाव आदी मुद्दे उपस्थित केले जात आहेत. तर करवाढ न लादता केलेल्या विकासकामांची जंत्री बहुजन विकास आघाडीकडून प्रचारात सादर केली जात आहे.

CS CamScanner

Scanned with OKEN Scanner

म. टा. पु. पान क्र. 1

# वसई, नालासोपाऱ्यात प्रचाराची रणधुमाळी

म. टा. पु. पान क्र. ३

## कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला

म. टा. वृत्तसेवा, वसई





निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वसई आणि नालासोपारा मतदारसंघात सध्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. मतदारांना आपल्याकडे वळविण्यासाठी उमेदवार आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून विविध कल्पना लढविल्या जात आहेत. जाहीर सभा, रोड शो, चौक सभा, बैठका घेण्यात येत असून त्याद्वारे प्रचार सुरू आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी सध्या प्रचाराचा टप्पा सुरू आहे. त्यामुळे वसई, नालासोपाऱ्यात प्रचाराला चांगलाच वेग आला आहे. प्रचारासाठी शेवटचे अवघे चार दिवस राहिलेले असताना यादरम्यान विविध उमेदवारांनी प्रचारासाठी जोर लावला आहे. वसई आणि नालासोपारा मतदारसंघात दोनही ठिकाणी बहुजन विकास आघाडीचे उमेदवार उभे असून वसईतून हितेंद्र ठाकूर आणि नालासोपाऱ्यातून क्षितिज ठाकूर निवडणूक लढवित आहेत. वसई-विरार हा भाग बविआचा बालेकिल्ला असल्याने या ठिकाणी विधानसभा मतदारसंघासह महापालिकेतही एकहाती सत्ता राहिली आहे. महापालिकेत विविध जातीधर्मांच्या व्यक्तींना नगरसेवकपदासाठी पुढे केल्याने त्यांनी प्रत्येक जाती धर्माच्या व्यक्तींपर्यंत पोहोचल्याचे साजते. त्यामुळे या निवडणुकीत सर्व जाती धर्मांच्या मतदारांची मते आपल्याकडे वळविण्यासाठी पुन्हा एकदा दारोदारी प्रचार करीत त्यांच्या समस्या जाणून घेण्यात येत आहेत. तसेच केलेल्या विकासकामांची आठवण देखील यावेळी करून देत आहेत. नालासोपाऱ्यात उत्तर भारतीयांच्या मतांसाठी बविआने नुकताच पार पडलेल्या छटपूजा व अन्य कार्यक्रमातून उत्तर भारतीय बांधवांच्या भेटीगाठी घेत त्यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला.

तर भाजप महायुतीतर्फे वसईत स्नेहा दुबे आणि नालासोपाऱ्यातून राजन नाईक निवडणूक लढवत आहेत. या दोनही उमेदवारांच्या प्रचारासाठीं सध्या स्टार प्रचारकांची रेलचेल वसई विरारमध्ये पाहायला मिळत आहे. नालासोपारा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात उत्तर भारतीय मतदारवर्ग आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत ही मते महायुतीच्या विजयात अत्यंत निर्णायक ठरली होती. त्यामुळे या मतदारांची मते आपल्या पारड्यात पडावी यासाठी उमेदवारांकडून याकडे लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. महायुतीचेच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी एकापाठोपाठ एक असे भाजपचे नेते दाखल होत आहेत. भाजपने खासदार मनोज तिवारी यांचा रोड शो करीत जनसंवाद यात्रा केली. अभिनेते व खासदार रवी किशन यांचा ही रोड शो ठेवण्यात आला होता.

## सरनाईक बदनामी प्रकरणी गुन्हा

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

आमदार प्रताप सरनाईक यांचा आक्षेपार्ह व्हिडीओ पसरवल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अज्ञात व्यक्तिविरोधात काशिगाव पोलिस ठाण्यात हा गुन्हा दाखल झाला आहे.

मिरा-भाईंदर परिसरात एका अज्ञात मोबाइल क्रमांकावरून व्हिडीओ पसरवला जात आहे. यात सरनाईक यांचा फोटो मॉर्फ करून वापरण्यात आला आहे. तसेच काही आक्षेपार्ह मजूर लिहिण्यात आला आहे. या प्रकरणाची तक्रार सरनाईक यांच्या कार्यकर्त्यांकडून काशिगाव पोलिस ठाण्यात देण्यात आली. त्यावरून अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

N.B.T. पान क्र. 8

# थप्पड़ का बदला लेने के लिए चाकू घोंपा

■ निसं, विरार: फुलपाडा इलाके में शराब पीकर एक व्यक्ति की एक युवक के साथ बहस के बाद गाली गलौज हो गई। गुस्से में आकर युवक ने उसे थप्पड़ जड़ दिया। इस थप्पड़ का बदला लेने के लिए शराबी व्यक्ति ने दूसरे दिन उस युवक पर चाकू से हमला कर दिया। युवक को निजी अस्पताल में भर्ती किया गया है। जानकारी के अनुसार, विकास नगरी निवासी बापू सदाशिव कांबली (37) श्मशान भूमि के पास काम कर रहा था। उसी समय नागेश मौर्या शराब पीकर आया और कांबली के साथ गाली गलौज करने लगा। इस पर कांबली ने उसे थप्पड़ मार दिया। दूसरे दिन कांबली अपने दोस्त के साथ चाय की दुकान पर चाय पी रहा था, तभी नागेश मौर्या पीछे से आया और उसकी पीठ पर चाकू घोंप दिया।

# 64 हजार लाभार्थी बहनों पर टिका है महायुति का सपना



■ निसं, नालासोपारा: नालासोपारा में चुनाव बड़ा दिलचस्प होने जा रहा है। आरोप-प्रत्यारोप का दौर तेज हो गया है। बहुजन विकास आघाडी जहां विकास कार्यो के मुद्दे पर वोट मांग रही है, तो वहीं महायुति ने नालासोपारा में परिवर्तन लाने का सपना दिखाया है। यहां पर महायुति की चुनावी नैया लाडली बहन पर टिकी है। नालासोपारा में 64 हजार महिलाओं ने लाडली बहन योजना का लाभ लिया है।

बता दें कि नालासोपारा विधानसभा क्षेत्र में 6 लाख 8 हजार मतदाता पंजीकृत हैं। इस विधानसभा में एमवीए, महायुति, बहुजन विकास आघाडी व प्रहार जनशक्ति पार्टी के उम्मीदवारों के बीच मुकाबला है। हालांकि असली लड़ाई बविआ व महायुति के बीच ही है। 2019 में महायुति से अविभाजित शिवसेना के उम्मीदवार प्रदीप शर्मा को 1,06,139 वोट मिले थे। बविआ के क्षितिज ठाकुर को 1,49,868 वोट मिले थे।

N.B.T. पान क्र. 8

# माननीय आए तो थे वोट मांगने, लोगों ने छोड़ दिया सवाल... विधायक जी, हमारा फुटपाथ कहां है?

## बुनियादी सुविधाओं से जूझती जनता के सवालों पर प्रत्याशियों ने साधी चुप्पी

■ सुरेंद्र नेगी, नालासोपाराः वसई-विरार में जनप्रतिनिधियों की उदासीनता व प्रशासन की लापरवाही के चलते सड़कों पर खुलेआम फेरीवालों का अतिक्रमण हुआ है। फुटपाथ पर चलने की जगह तक नहीं है। यहां की हर गली, सड़क, मोहल्ला, चौराहे पर साग-सब्जी वालों के साथ ही अवैध फूड स्टॉल्स और ऑटो चालकों का कब्जा दिखाई देता है। ऐसे में आगामी चुनाव में वोट मांगनेवाले उम्मीदवारों को भी दो-टूक सुननी पड़ रही है। अतिक्रमण की समस्या से परेशान लोग अब नेताओं और उम्मीदवारों से फुटपाथ की समस्या को लेकर सवाल कर रहे हैं। हालांकि इनके पास कोई जवाब नहीं है।

**हर जगह अतिक्रमणः** सड़कों पर अतिक्रमण इतना हो चुका है कि लोगों को राह चलना तक मुश्किल हो गया है। फेरीवालों को सड़क से हटाकर दूसरी जगह शिफ्ट करने के लिए भी प्रशासन के पास कोई विकल्प नहीं है। प्रशासन के लिए अवैध फेरीवाले बड़ी चुनौती बन गए हैं। नालासोपारा, विरार व वसई की हर गली और मुख्य सड़कों पर फेरीवाले अपना व्यवसाय कर रहे हैं। फुटपाथ लगभग गायब ही हो चुके हैं। लोगों को जान जोखिम में डालकर मजबूरन बीच सड़क पर चलना पड़ता है। फेरीवालों की वजह से ट्रैफिक जाम की समस्या लगातार गंभीर होती जा रही है।



### क्या कहते हैं फेरीवाले

ट्रैफिक पुलिस विभाग ने सड़क पर कब्जा जमाए फेरीवालों को हटाने के लिए पिछले पांच साल में स्थानीय जनप्रतिनिधियों व प्रशासन को सैकड़ों पत्र दिया है, लेकिन अब तक कोई कार्रवाई नहीं हुई। दूसरी ओर, फेरीवालों का कहना है कि उनके लिए रखी गई आरक्षित जमीनों पर बड़ी-बड़ी इमारतें खड़ी हो गई हैं। मनपा हमें कोई जगह उपलब्ध नहीं करा रही है, जिसकी वजह से हमें मजबूरन सड़कों पर बैठना पड़ता है। लॉकडाउन के बाद से शहर में फेरीवालों की संख्या दोगुनी हो गई है। जनप्रतिनिधियों व प्रशासन की लापरवाही से शहर में फेरीवाला जोन व मार्केट जोन तक नहीं बन सका है।

### इमरजेंसी के दौरान होती है परेशानी

वसई, नालासोपारा व विरार में भीड़-भाड़ वाले क्षेत्रों में फेरीवालों की वजह से कई बार इमरजेंसी सेवाएं प्रभावित होती हैं। खरीदारी के वक्त ग्राहकों की भारी भीड़ होती है, इससे ट्रैफिक जाम भी हो जाता है। ऐसे में ऐम्बुलेंस, पुलिस व फायर ब्रिगेड की गाड़ियों को रास्ता ही नहीं मिलता। मरीजों को समय पर उपचार नहीं मिल पाता।

### मनपा के पास 15 हजार फेरीवालों का रिकॉर्ड

हर शहर में फेरीवालों का रजिस्ट्रेशन किया जाता है और उन्हें बकायदा मनपा से फेरीवाला प्रमाणपत्र भी दिया जाता है। इसके जरिए फेरीवालों को केंद्र सरकार की योजनाओं से लोन भी मिलता है। वसई-विरार मनपा के पास केवल 15 हजार फेरीवालों का ही रिकॉर्ड है, जबकि शहर में फेरीवालों की संख्या लगभग दो लाख से अधिक है।

नवभारत पू. पान क्र. 4

### देर रात अचानक लगी भीषण आग

# नालासोपारा में 3 दुकानें व 9 टपरी जल कर ख़ाक



नालासोपारा (सं), पूर्व तुलिंज पुलिस स्टेशन के समीप स्थित मार्केट में बीते बुधवार की देर रात दो बजे अचानक भीषण आग लगने की घटना हुई. इस आग की घटना में 3 फर्नीचर की दुकानें और उसके सामने लगी 8 से 9 टपरी पूरी तरह जलकर ख़ाक हो गईं. इस घटना की जानकारी लगते ही मौक़े पर पहुंची वसई विरार मनपा के अग्निशमन विभाग की टीम ने अथक प्रयास के बाद आग पर काबू पाया. मौके पर पहुंचे महाविकास आघाड़ी उम्मीदवार संदीप पाण्डेय ने पीड़ित लोगों से मुलाक़ात कर उन्हें हर संभव मदद का भरोसा दिया है.

### सार्टसर्किट से आग लगने की संभावना

स्थानीय नागरिकों की मानें तो उस स्थान पर पुराने फर्नीचर की रिपेयरिंग और बिक्री का व्यवसाय होता था. रात दो बजे के आसपास संभवतः सॉर्टसर्किट से दुकान में आग लग गई. फर्नीचर होने के कारण आग ने तुरंत विकराल रूप धारण कर लिया.

CS CamScanner

Scanned with OKEN Scanner

The free Press Journal

JUNKIES' REVENGE ON CRUSADER

# 10-yrs jail for burning Cong corporator's front door

**Suresh Golani**
MIRA BHAYANDAR

Two drug addicts have been sentenced to ten years of rigorous imprisonment for setting fire to the door of a corporator's residence in Mira Road six years ago.

The incident dates back to February 3, 2018, when a few miscreants locked the main door of the Congress corporator Zuber Inamdar's apartment, doused it with petrol and set it ablaze at around 3.30am. The sequence of events was captured on a CCTV camera in the vicinity.

Inamdar, who was at home with his family at the time of the incident, had suspected it to be an act of vengeance by local drug addicts linked to a drug mafia whom he had been opposing.

Based on a complaint lodged by his daughter Rufi Inamdar, the Naya Nagar police registered a case. The accused – Uneb Naasir Kewal and Asif Anwar Khan – were arrested after an investigation.

# Trichy gang member held in Tamil Nadu

**Suresh Golani**
MIRA BHAYANDAR

The crime detection unit attached to the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police have arrested a member of the notorious 'Trichy' gang from Tamil Nadu. He was involved in breaking car windows and stealing cash, laptops and other valuables in Nallasopara, Vasai, Borivali and other parts of Mumbai.

On October 19, the accused Shangumam Amarnathan, 38, had broken the windows of a locked car parked outside a bank in Nallasopara and decamped with two high-end laptops. On the virtue of electronic surveillance and inputs provided by informers, the police learnt about his presence in Tiruchirappalli district and arrested him.

Mid-Day.

# Senior seductress strikes again!

## Woman, 64, used to gain trust of older walkers with stories of personal hardship, before making off with their valuables

**SAMIULLAH KHAN**
samiullah.khan@mid-day.com

THE MHB Colony police have arrested a 64-year-old woman from Bhayandar who would steal jewellery from senior citizens whom she would befriend on the streets. On Wednesday, the accused, Geeta Patel, was busted by a Borivli resident while allegedly attempting to snatch a gold chain worth ₹1.5 lakh from an 80-year-old. » P02




our city
50-year-old woman arrested for befriending and duping elderly men

mid-day's August 17, 2015 report; (left) Geeta Patel, the accused

**10** No. of cases registered against Geeta Patel

Scanned with OKEN Scanner